# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
# दिनांक २५/०५/२०२२ (बुधवार)

---

## अवैधरित्या कोळसा साठवुन ठेवणा—या आरोपीविरूध्द कारवाई

पोलीस स्टेशन कन्हान — दिनांक २४.०५.२०२० रोजी यातील फिर्यादी नामे —हरिराम लालमोहन यादव वय ४३ वर्ष रा कॉर्टर नं. १०/१८ न्यू टेकाडी कॉलनी कन्हान जिल्हा नागपुर यांना फोनद्वारे माहीती मिळाली कि, कन्हान अंतर्गत गोंडेगाव गाव भाटीया कोलवासरी कंपनी. तसेच शितला मदीर चे मागे  कोळशाचा अवैधरीत्या खरेदी चालु आहे, अशी माहिति मिळताच फिर्यादी व एम.एस.एफ तसेच कन्हान पोलीस स्टेशनचा स्टॉफ घटनास्थळी पोहचले असता, सदर कोळशाचा ढिगारा हा अनुक्रमे **आरोपी — १. मिथुन नडार, २. भुजग महल्ले रा टेकाडी ३. उमेश पानतावने  रा. काद्री ४. फारूख अब्दुला शेख वय ४५ रा कांद्री यांचा आहे, असे समजले.  सदर कोळशाचा ढिगारा हा पि. लोडर च्या सहाचने प्रति टन ८,०००/— रु प्रमाणे एकुण ५४ टन असुन त्याची एकुण किमत ४,४५,००० / रु चा माल चोरलेला मिळुन आल्याने कोल डेपो मध्ये जमा करण्यात आला.**

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— हरिराम लालमोहन यादव वय ४३ वर्ष रा कॉर्टर नं. १०/१८ न्यू टेकाडी कॉलनी कन्हान जिल्हा नागपुर यांचे तक्रारीवरून पोलीस स्टेशन कन्हान येथे नमुद आरोपीविरूध्द कलम ३७९, भा.दं.वि. अंतर्गत गुन्हयाची नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास पोहवा शेळके  पोस्टे कन्हान हे करीत आहेत.

## कोबड्या चोरी

पोलीस स्टेशन कन्हान :— बोर्डा गणेशी शेत शिवार ५ किमी पुर्व. यातील फिर्यादी याने आपले  बोर्डा गणेशी शिवारातील शेतात कुक्कटपालनासाठी टिनाचे शेड बांधले असुन त्यात पंचायत समिती पारशिवनी यांचे कडुन ८४ गावरानी कोबंड्या पालनासाठी एप्रील २०२२ मध्ये घेतल्या होत्या. दिनांक २०/५/२२ चे १२/०० ते १४/३० वा दर.  यातील फिर्यादी  हा आपले घरी हजर असता कोणीतरी अज्ञात इसमाने फिर्यादीचे शेतातील टिनाच्या शेड मधुन ५० गावरानी कोंबड्या किमती अंदाजे १५,०००/रु चा माल चोरुन नेला आहे. फिर्यादीने आतापर्यत कोंबडयाचा शोध घेतला मिळुन आल्या नाही. म्हणुन आज रोजी पोलीस स्टेशनला येवुन रिपोर्ट दिली

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— ज्ञानेश्वर धनश्याम मोहने वय ३९ वर्ष रा. बोर्डा गणेशी ता. पारशिवनी यांचे रिपोर्टवरुन पोस्टे कन्हान येथे अज्ञात आरोपीविरूध्द ३७९ भादवी अन्वये गुन्हा नोंद केलेला असून पुढील तपास पो हवा  शेळके  पोस्टे कन्हान  हे करीत आहे.

## मोबाईल चोरी करणारा आरोपी विरूध्द कारवाई

**पोलीस स्टेशन काटोल :–** अंतर्गत निरंजन राउत यांचे काटोल वाढोणा रोडवरील शेतात ३ किमी पश्चिम. दिनांक २४/५/२२ चे ०७/०० ते ०८/०० वा. दर. यातील फिर्यादीची मुलगी झोपडीचे बाहेर बसुन मोबाईल किं. ८,०००/– रू. चा पाहत असता आरोपीने मुलीला पिण्याकरिता पाणी मागतिले असता, मुलगी मोबाईल बाहेर ठेवुन पाणी आणण्याकरिता घराचे आतमध्ये गेली असता, यातील आरोपी हा मोबाईल चोरी करून निघुन गेला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– राजेश शामराव मरसकोल्हे वय ५० वर्ष रा. धामनेवाडा जि. गोदिंया ह. मु. निरंजन राउत यांचे वाढोणा रोडवर. यांचे रिपोर्टवरुन पोस्टे काटोल येथे **आरोपी नामे– कल्लु उर्फ दिपसिंग जोंगिदरसिंग भादा रा. शीख मोहल्ला काटोल** यांचे विरूध्द कलम ३७९ भादवी अन्वये गुन्हा नोंद केलेला असून पुढील तपास मपोहवा ज्योती सेवतकर पो.स्टे. काटोल मो.नं. ९५५२५५६३४१ हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

**पोलीस स्टेशन केळवद :–** अंतर्गत मौजा केळवद शिवार नागपुर ते छिंदवाडा रोड १ कि.मी पश्चिम. दिनांक २३/०५/२०२२ चे २१/३० वा यातील मृतक नामे – श्रावन गुलाब काळे रा. गोरेवाडा रोड गिट्टीखदान नागपूर ह.मु वसुले धाबा केळवद हे केळवद शिवारातील नागपूर ते छिंदवाडा रोड ओलांडत असता सौंसर कडुन सावनेर कडे जाण्या–या कोणत्यातरी अज्ञात वाहनाचे चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपने चालवुन मृतक यास धडक देवुन त्याचे मरण्यास कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– पंकज शरदचंद्रजी वसुले वय ३८ वर्ष रा . केळवद वार्ड क्र ०४ त दृ सावनेर यांचे रिपोर्टवरून पोस्टे केळवद येथे आरोपीविरूध्द कलम २७९,३०४ (अ) भा.द.वी सहकलम १८४,१३४,१७७ मोवाका अन्वये गुन्हा नोंद केलेला असून पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक श्री आत्राम मो.नं ९४०५१९४३१७ हे करीत आहे.

## गळफास घेवुन आत्महत्या

**पोलीस स्टेशन रामटेक :–** अंतर्गत काचुरवाही १५ किमी पुर्व, दिनांक २४.०५.२०२२ चे १७.०० वा दरम्यान, यातील मृतक नामे– मयुर मारोती मोहनकर वय २४ वर्ष रा. काचुरवाही यांने कोणत्यातरी अज्ञात कारणावरून आपले घराचे वरचे मजल्यावर कॉटन च्या दोरीने बांधुन गळफास घेतला. त्याला उपचारा करीता उपजिल्हा रूग्णालय रामटेक येथे आणले असता डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– मारोती गोदरू मोहनकर वय ५२ वर्ष रा. काचुरवाही यांचे रिपोर्टवरून पो स्टे रामटेक येथे कलम १७४ जाफौ अन्वयें गुन्हा दाखल करण्यात आला. सदर मर्गचा पुढील तपास पोहवा /सुरेश धुर्वे पोस्टे रामटेक मो. नं. ९९२२९३५८७८ करीत आहेत

**पोलीस माहीती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपुर**